**महाराष्ट्र शासन**

क्र. इबांका २०१८/प्र.क्र.१३५/काम-७
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २० डिसेंबर, २०१८

प्रति,

सह/उप सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना),
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.

**विषय** :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील जिल्हा कार्यकारी अधिकारी, (१ पद) आणि उप कार्यकारी अधिकारी (२० पदे) ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत.

**संदर्भ** :- शासनपत्र समक्रमांक दिनांक १६ नोव्हेंबर,२०१८

महोदय/महोदया,

संदर्भिय पत्रान्वये, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ नुसार त्यांच्या मुख्यालयासह विविध जिल्हा कार्यालयांकरिता जिल्हा कार्यकारी अधिकारी (गट-अ), महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ (१ पद) आणि उप कार्यकारी अधिकारी (गट-ब), महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ (२० पदे) अशी एकूण २१ पदे प्रतिनियुक्तीने भरण्याकरिता शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रकाशित केली होती. त्यानुसार अर्ज करण्याची शेवटची तारीख २ डिसेंबर, २०१८ अशी होती.

२. **या पत्रान्वये उक्त पदांच्या प्रतिनियुक्तीसाठी संदर्भिय पत्रातील अटींच्या अधीन राहून दिनांक ५ जानेवारी, २०१९ पर्यंत अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.**

३. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

आपला,

(श.मा.साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :- १. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
२. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य , मुंबई.
३. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म. इ. व इ. बां. का. कल्याणकारी मंडळ, मुंबई.
४ निवडनस्ती (कामगार-७)

C:\Users\parveen.jugari\Desktop\PIMPLE\CR\२०१८\C R १३५.२०१८ प्रतिनियुक्तीने पदे भरण्याबाबत.docx